**सदस्य, औद्योगिक न्यायालय, सोलापूर यांचे न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी प्र.प्र.राजवैद्य)

**तक्रार (अ.का.प्र.) क्र.१७९/२०१८** **नि.क्र.ओ–**
(CNR NO. MHIC13000-326-2018)

श्री.जगन्नाथ मसाजी बनसोडे }...**तक्रारदार.**

**विरूध्द**

१.सोलापूर महानगरपालिका, }
२.आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, }
३.सहायक आयुक्त, सोलापूर महानगरपालिका. }...**सामनेवाले.**

.......................................................................................

श्री.बी.टी.जाधव, तक्रारदारातर्फे विद्वान वकील.
श्री.एस.एस.कालेकर, सामनेवालेतर्फे विद्वान वकील.

.......................................................................................

## प्राथमिक मुद्यांवर आदेश

(पारित दिनांक २०/०९/२०२४)

१. महाराष्ट्र कामगार संघांना मान्यता देणेबाबत व अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध करणेबाबत अधिनियमाचे कलम २८ सह अनुसुचि ४ आयटम ९ व १० खाली प्रस्तुतचा तक्रार अर्ज दाखल करण्यात आला आहे.

२. तक्रार अर्जातील प्रकथने थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत;

तक्रारदार हा सामनेवाले यांच्याकडील आयातकर विभागात आयातकर निरीक्षक म्हणून १९८७ सालापासून कामास आहे. सामनेवाले यांनी तक्रारदाराकडे व्यवस्थापकीय स्वरुपाची कोणतीही कामे दिलेली नाहीत व त्याला कुठलेही प्रशासकीय निर्णय घेण्याचे अधिकार नाहीत त्यामुळे तक्रारदार हा सामनेवाले यांचा नोकर आहे. सामनेवाला क्र.१ ने तक्रारदारास दि.२७/११/२०१३ रोजी दोषारोपपत्र देवून त्याचेवर निलंबनाचे कारवाई केली होती. तक्रारदाराने खुलासा सादर केल्यानंतर विभागीय चौकशी घेण्यात आली मात्र तक्रारदारास बाजू मांडण्याची संधी न देता घाईघाईने व निसर्ग न्यायतत्वांचा अवलंब न करता चौकशीचे कामकाज पूर्ण करण्यात आले. दोषारोपपत्रात चुकीचे व खोटे आरोप करण्यात आले होते व चौकशी अधिकारी यांनी सामनेवाले यांचेकडून महत्वाची कागदपत्रे दाखल करुन घेतली तसेच तक्रारदाराने दाखल केलेल्या कागदपत्रांचा विचार न

करता पूर्वग्रहदूषित निष्कर्ष काढण्यात आले. चौकशी अधिकारी यांनी काढलेला निष्कर्ष चुकीचा आहे. चौकशी अधिकारी यांनी अहवालात बऱ्याचशा बाबी लपवून ठेवल्या आहेत. व्यवस्थापनाने कुठलाही ठोस पुरावा सादर केला नाही मात्र ही बाब चौकशी अधिकारी यांनी अहवालात नमूद केली नाही. असे असूनही सामनेवाला क्र.१ ने दि.२६/०९/२०१७ रोजीचे आज्ञापत्र काढून तक्रारदारास अशी शिक्षा दिली की त्याच्या दोन वेतनवाढी पुढील वेतनवाढीवर परिणाम होईल अशारितीने स्थगित ठेवण्यात याव्या तसेच दि.११/७/२०१३ ते २०/११/२०१५ हा निलंबन कालावधी अनुज्ञेय रजा म्हणून ग्राहय धरण्यात यावा.

३. शिक्षेचा तो आदेश रद्द करण्यासाठी तक्रारदाराने दिलेला अर्ज सामनेवाले यांनी दि.११/०६/२०१८ रोजी फेटाळला. दि.१०/१२/२०१५ रोजी चौकशी संपली ज्यानंतर तक्रारदारास दि.२१/११/२०१५ पासून कामावर घेण्यात आले. तक्रारदारावर भारतीय दंड संहितेच्या कलम ४०९ खाली फौजदारी कारवाई करण्यात आली होती मात्र फौजदारी न्यायालयाने दि.१७/१२/२०१६ रोजी त्या प्रकरणातून तक्रारदाराची निर्दोष मुक्तता केली तरीही त्याला वर नमूद केल्याप्रमाणे शिक्षा देवून सामनेवाले यांनी अनुचित कामगार प्रथांचा अवलंब केला.

४. उपरोक्त नमूद कारणासाठी तक्रारदाराने विनंती केली आहे की सामनेवाले यांनी अनुचित कामगार प्रथांचा अवलंब केला आहे असे घोषित करण्यात यावे व सामनेवाले यांनी दि.२६/०९/२०१७ रोजी काढलेले आज्ञापत्र व त्या अनुषंगाने देण्यात आलेली शिक्षा रद्द करण्यात यावी.

५. सामनेवाले यांनी नि.क्र.सी.६ वर कैफीयत दाखल करत तक्रार अर्जास विरोध दर्शविला आहे. तक्रारदाराने तक्रार अर्जात त्यांचेविरुध्द केलेली सर्व प्रकथने नाकबूल करत सामनेवाले यांनी असे निवेदन केले आहे की तक्रारदार हा आयातकर निरीक्षक या पदावर सुपरवायझरी कॅटेगरी मध्ये कामास असल्यामुळे तो वर्कमन नाही व त्यामुळे तक्रार अर्ज खारीज होण्यास पात्र आहे. सामनेवाले यांच्या मते, खातेनिहाय चौकशीअंती दि.२६/०९/२०१७ रोजी शिक्षा देण्यात आली ज्यानंतर तक्रारदाराने रितसर अपिल व पुनर्विचार अर्ज दिले होते जे फेटाळण्यात आल्यानंतर तक्रारदाराने प्रस्तुतचा तक्रार अर्ज दाखल केला असल्याने तसेच तो

मुदतीत नसल्यामुळे चालणेयोग्य नाही.

६. सामनेवाले यांच्या मते, तक्रारदार हा श्री.सरवदे यांचेसह चौत्रा तुळजापूर नाका येथे कार्यरत असताना त्यांनी दोघांनी मिळून महानगरपालिकेची रक्कम रु.१६,३८०/— स्वत:च्या फायद्यासाठी वापरुन अपहार केला होता त्यामुळे त्यांना दोघांनाही निलंबित करुन दि.२७/११/२०१७ रोजी दोषारोपपत्र देण्यात आले होते. सामनेवाले यांच्या मते, दि.१०/०७/२०१३ रोजी पावती पुस्तक क्र.३५३८ ते ३५४७ यांची तपासणी केली असता त्यानुसार नाक्यावर एकूण रक्कम रु.१,५३,१७०/— इतकी जमा होणे आवश्यक असताना केवळ रक्कम रु.१,३६,७९०/— इतकीच आढळून आली होती तसेच तुळजापूर नाक्यावरील एस्कॉर्ट वसूली सन २०१२ च्या तुलनेत कमी झाल्याने निष्पन्न झाले होते त्यामुळे तक्रारदाराने महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणुक नियमावलीतील नियम ३(१) नुसार महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपिल नियमावलीतील नियम ४(१)क चा भंग केला असे आरोप लावण्यात आले होते.

७. सामनेवाले यांच्या मते, चौकशी अधिकारी नियुक्त करुन व तक्रारदारास रितसर संधी देवून खातेनिहाय चौकशीचे काम पूर्ण करण्यात आले होते तसेच तक्रारदारावरील आरोप चौकशीअंती सिध्द झाल्याचा निष्कर्ष चौकशी अधिकारी यांनी काढल्यामुळे त्याला योग्य ती शिक्षा देण्यात आली आहे ज्यामध्ये सामनेवाले यांनी कोणत्याही अनुचित कामगार प्रथांचा अवलंब केला नाही. उपरोक्त नमूद सर्व कारणांसाठी तक्रार अर्ज खर्चासह खारीज करण्याची विनंती सामनेवाले यांनी केले आहे.

८. प्रकरणात दि.२०/०९/२०२३ रोजी नि.क्र.ओ.३ वर इंग्रजी भाषेत प्राथमिक मुद्दे निश्चित करण्यात आले. त्या प्राथमिक वादमुद्यांचे मराठी भाषांतर त्यासमोर मी नमुद केलेल्या निष्कर्षासह व कारणांसह पुढीलप्रमाणे आहेत.

| <u>प्राथमिक वादमुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|
| i)तक्रारदाराविरूध्द करण्यात आलेली विभागीय चौकशी बेकायदेशीर, चुकीची व निसर्ग न्यायतत्वाविरूध्द नव्हती व त्यामुळे अयोग्य आहे हे तक्रारदाराने सिध्द केले का? | ...नाही. |

| | |
|---|---|
| ii)चौकशी अधिकाऱ्याचे निष्कर्ष चुकीचे आहेत हे तक्रारदाराने सिध्द केले काय? | ...होय. |

## **का र ण मि मां सा**

९. सामनेवाले यांनी चौकशीची कागदपत्रे दाखल केली. तक्रारदाराच्या वतीने विद्वान वकील श्री.बी.टी.जाधव यांचा तर सामनेवाले यांच्या वतीने विद्वान वकील श्री.एस.एस.कालेकर यांचा युक्तिवाद मी ऐकला. संपुर्ण संचिकेची मी पाहणी केली.

१०. सर्वप्रथम दोन्ही पक्षांना मान्य असलेल्या बाबी खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहेत;

(अ) तक्रारदार हा सामनेवाले यांचेकडे १९८७ सालापासून आयातकर विभागात आयातकर निरीक्षक म्हणून कामास आहे.

(ब) सामनेवाले यांनी तक्रारदारास दि.२७/११/२०१३ रोजी ज्ञापन देवून त्याचेवर निलंबनाची कारवाई केली.

(क) सामनेवाले यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियमावली अन्वये तक्रारदारास दोषारोपपत्र दिले.

(ड) सामनेवाले यांनी विभागीय चौकशी केली ज्यामध्ये तक्रारदाराने भाग घेतला.

(इ) चौकशी अधिकारी यांनी दि.१०/१२/२०१५ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार तक्रारदारावर ठेवण्यात आलेले एस्कॉर्ट व स्थानिक कर इष्टांक वगळता इतर सर्व दोषारोप सिध्द झाले असा अहवाल दिला.

(ई) तक्रारदाराने दाखल केलेला अपिल अर्ज दि.११/०६/२०१८ रोजीच्या आदेशाने व पुनर्विचार अर्ज दि.१८/९/२०१८ रोजीच्या आदेशाने फेटाळण्यात आला ज्यानंतर तक्रारदाराने दि.२०/१०/२०१८ रोजी प्रस्तुतचा तक्रार अर्ज अनुसूची ४ च्या आयटम ९ व १० खाली दाखल केला.

**कारणे—प्राथमिक मुद्दे क्र.(i) व (ii) करिता:**

११. तक्रारदाराच्या विद्वान वकीलांनी युक्तिवाद केला की तक्रारदारास बाजू मांडण्याची संधी न देता घाईघाईने चौकशीचे काम पूर्ण करण्यात आले व त्याद्वारे चौकशी अधिकारी यांनी निसर्ग न्यायतत्वांचा भंग केला. सामनेवाले यांनी प्रकरणात दाखल केलेल्या चौकशीच्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की तक्रारदाराने बचावाचे निवेदन सादर केल्यानंतर चौकशी अधिकारी यांचेसमोर सामनेवाले यांच्यावतीने तपासण्यात आलेल्या साक्षीदारांचा उलटतपास घेण्याची संधी तक्रारदार यास देण्यात आली होती व त्यानुसार तक्रारदाराच्या वतीने

उलटतपास घेण्यात आला होता तसेच चौकशी अधिकारी यांनी तक्रारदारास त्याचेवतीने साक्षीदार तपासण्याची परवानगी दिली होती.

१२. चौकशी अहवाल वाचला असता असे दिसून येते की चौकशी अधिकारी यांचेकडे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये काही कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे दिसून आल्याने चौकशी अधिकारी यांनी स्वतःहून संबंधित विभागात जावून ती कागदपत्रे हस्तगत केली व चौकशीकामी वापरली. त्या संदर्भात चौकशी अहवालाच्या परिच्छेद क्र.२(क) मधील मजकूर याठिकाणी नमूद करणे उचित राहील.

> २(क) चौकशी अधिकाऱ्यांना जकात नाक्याच्या वरिष्ठांचा कोणताही अहवाल प्रकरणाच्या धारिणीत दिसून न आल्याने त्यांनी साप्रवि शाखेत स्वत: जावून चौकशी केली असता आयातकर अधिक्षक यांचे पत्र क्र.स्थासंक/८/काअ/६८ दि.३१/०७/२०१३ त्या सोबतच्या १ ते ३१ कागदपत्रांसह चौकशी अधिकाऱ्यांनी दि.१०/०७/२०१४ रोजी प्राप्त करुन घेतले. तसा चौकशी अधिकाऱ्यांचा शेरा सदर पत्रावर उपलब्ध आहे. त्या पत्रासोबतच्या जबाबावरुन खालील साक्षीदारांना साक्षीसाठी चौकशीत बोलाविण्यात आले.

१३. उपरोक्त नमूद मजकूरावरुन ही बाब स्पष्ट आहे की चौकशी अधिकारी यांचेकडे विभागाने सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये काही कागदपत्र उपलब्ध दिसून न आल्याने चौकशी अधिकारी यांनी ती बाब सामनेवाले यांना न देता थेट संबंधित शाखेत स्वत: जावून चौकशी करुन ती कागदपत्रे हस्तगत केली व त्या कागदपत्रांच्या आधारे साक्षीदारांना साक्षीकामी पुढे बोलावले. त्या संदर्भात चौकशी अधिकारी यांनी केलेली कारवाई उचित नव्हती हे जरी खरे असले तरी त्यावरून तक्रारदारावर अन्याय झाला असे म्हणता येणार नाही कारण आधी तयार असलेली कागदपत्रेच चौकशी अधिकारी यांनी हस्तगत केली ही बाब स्पष्ट असल्याने चौकशी अधिकारी यांनी त्या संदर्भात निसर्गन्यायतत्वांचा भंग केला असे म्हणता येणार नाही. सबब, निसर्गन्यायतत्वांचा भंग करून चौकशीचे काम पुर्ण करण्यात आले हे तक्रारदाराचे वतीने करण्यात आलेले प्रकथन स्विकारार्ह नाही.

१४. तक्रारदारावर खालीलप्रमाणे दोषारोप लावण्यात आले होते;

(१) दि.१०/७/२०१३ रोजी सायंकाळी ८.०० वाजता तुळजापूर

एस्कॉर्ट नाक्यावर एस्कॉर्टच्या एकूण रकमेची व त्या दिवशी वापरलेल्या पावती पुस्तकांतील पावती क्र.३५३८ ते ३५४७ या बुकातील पावत्यांची तपासणी केली असता रु.१,५३,१७०/— एवढी रक्कम नाक्यात असणे आवश्यक होते. परंतू प्रत्यक्षात नाक्यामध्ये रु.१,३६,७९०/— इतकी रक्कम आढळून आलेली आहे. एकूण एस्कॉर्ट पोटी वसूली केलेल्या रकमेमध्ये रु.१६,३८०/— इतकी रक्कम कमी असल्याचे आढळून आलेले आहे.

(२) श्री.जे.एम.बनसोडे यांनी चौत्रा तुळजापूर एस्कॉर्ट नाक्या मधून म.न.पा.ची सरकारी रक्कम भरणामधील रु.१६,३८०/— इतकी रक्कम खाजगी कारणास्तव आपण घेवून गेलेचे सिध्द झालेले असून त्याचा उपयोग स्वत:च्या उपभोगासाठी केला असून सदर नाक्यातील १६ ते २४ या पाळीतील कार्यरत असलेले सेवकांनी आपण रु.१६,३८०/— इतकी रक्कम घेवून गेलेचे सांगितलेले आहे.

(३) आपण म.न.पा.ची रक्कम रु.१६,३८०/— एवढी रक्कम नाक्यातून घेवून जात असताना आपले वरिष्ठ अधिकारी यांना कल्पना दिली नाही. वरिष्ठांची परवानगी घेतली नाही. त्यांची नोंद रजिस्टरला केली नाही. विनापरवाना म.न.पा.ची सरकारी रक्कम परस्पर वापरली. यावरुन श्री.जे.एम.बनसोडे यांनी म.न.पा.चे रकमेचा आपण अपहार केलेचे सिध्द होत आहे.

(४) श्री.जे.एम.बनसोडे यांचे गैरवर्तनामुळे जनमानसात म.न.पा.ची प्रतिमा मलिन झालेली असून त्यास सर्वस्वी श्री.जे.एम.बनसोडे हेच जबाबदार आहेत. सदरची रक्कमेबाबत आपणास भ्रमणध्वनीवरुन विचारणा केली असता आपण सदर रक्कम घेतल्याचे कबूल केले आहे.

(५) सदर आर्थिक अपहाराची बाब ही कार्यालयीन शिस्तीचा भंग करणारी आहे. आपण आपले कर्तव्य चोखपणे पार न पाडता कार्यालयीन कामकाजामध्ये आर्थिक गैरव्यवहार केलेला असून आपण बेजबाबदारपणा व निष्काळजीपणा केल्याचे स्पष्ट होत आहे.

(६) आपणास तुळजापूर नाक्यास दरमहा एस्कॉर्ट व स्थानिक संस्था कराची वसुलीचे इष्टांक रुपये १५ कोटी इतके देण्यात आलेले होते. परंतू आपण माहे एप्रिल २०१३ मध्ये रू.७,०३,३८,२२९/—, मे २०१३ मध्ये रू.६,६२,२३,३७१/—, जून २०१३ मध्ये रू.८,१६,१६,९६०/— व माहे १ जुलै ते १० जुलै अखेर रू.३,१६,९८,२२९/— इतके वसूल आलले आहे. त्याची टक्केवारी माहे तुळजापूर नाक्यावरील एस्कॉर्ट वसूली मागील वर्षी सन२०१२ मध्ये माहे एप्रिल १२ मध्ये रु.८,०१,२१,७२६/—, मे२०१२ मध्ये रु.८,४९,८७,१२१/—, जून१२ मध्ये रु.८,५६,२८,५७९/— व माहे जुलै १२ मध्ये रु.९,९०,२४,१२७/— इतकी वसूली आणलेली आहे. सन २०१३ मध्ये सन २०१२ पेक्षा माहे एप्रिल मध्ये १२.२१ टक्के, मे मध्ये २२.०८ टक्के, जून मध्ये ४.६८ टक्के व माहे जुलै मध्ये ९.७८ टक्के इतके वसूली मागील वर्षापेक्षा कमी आणून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केलेले आहात. आपणास दिलेल्या इष्टांकापेक्षा कमी वसुली आणून आपण कामकाजामध्ये दुर्लक्ष, निष्काळजीपणा केलेचे स्पष्ट होत असून आपण आपले कर्तव्यात कसूर

केलेली आहे.

१५. तक्रारदारावर लावण्यात आलेल्या उपरोक्त नमूद दोषारोपपापैकी अ. क्र.६ मध्ये नमूद असलेले आरोप वगळून इतर दोषारोप सिध्द झाल्याचा निष्कर्ष चौकशी अधिकारी यांनी नोंदवला आहे. चौकशी अधिकारी यांच्या त्या निष्कर्षाविरूध्द सामनेवाले यांनी कुठलीही हरकत कधीही घेतली नाही ही बाब अभिलेखावर उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरून स्पष्ट आहे.

१६. तक्रारदाराची साप्ताहिक सुट्टी असल्याने तो दि.१०/०७/२०१३ रोजी कामावर हजर नव्हता ही बाब चौकशी अधिकारी यांनी स्विकारली असल्याचे चौकशी अहवालावरून दिसून येते. रु.१६,३८०/— चा अपहार दि.१०/७/२०१३ पूर्वी म्हणजे दि.०८/०७/२०१३ किंवा त्यापूर्वी झाला मात्र दि.१०/०७/२०१३ रोजी तो अपहार उघडकीस आला असा निष्कर्ष चौकशी अधिकारी यांनी काढला असे अहवालावरून दिसून येते. तक्रारदारावर बजावण्यात आलेल्या दोषारोपपत्रात तसा स्पष्ट दोषारोप लावण्यात आला होता असे दिसून येत नाही तरीही चौकशी अधिकारी यांनी तसा निष्कर्ष नोंदविला ही बाब स्पष्ट आहे. त्यासाठी चौकशी अधिकारी यांनी कुठलेही सयुक्तिक कारण त्यांच्या अहवालात नमूद केलेले दिसून येत नाही. तसा निष्कर्ष काढण्यासाठी त्यांनी अहवालात नमूद केलेली कारणे त्यांचा तो निष्कर्ष योग्य आहे हे स्विकारण्यास पुरेशी दिसून येत नाहीत.

१७. चौकशी अधिकारी यांनी अहवालात नमूद केले आहे की चार्जपट्टीवर असलेल्या स्वाक्षऱ्या पाहून साक्षीदारांनी रक्कम रु.१६,०००/— दि.८/०७/२०१३ ते दि.११/०७/२०१३ पर्यत कमी असल्याचे सांगितले व त्यानंतर दि. १८/०७/२०१३ पर्यंतच्या तपासणीतही तुळजापूर नाक्यावर रु. १६,३८०/— एव्हढी रक्कम कमी दिसून आली. मुळातच दि.१०/०७/२०१३ रोजी तक्रारदार कर्तव्यावर हजर नसतांना रक्कम कमी आढळून आल्याबाबत दोषारोप ठेवण्यात आलेला असल्याने पुन्हा दि.१८/०७/२०१३ पर्यतची करण्यात आलेली तपासणी विचारात घेवून रु.१६,३८०/— कमी दिसून आले ही बाब चौकशी अधिकारी यांनी विचारात घेणे गरजेचे नव्हते. चौकशी अधिकारी यांनी त्यांचेसमोर तपासण्यात आलेल्या साक्षीदारांचे पुरावे जरी विचारात घेतले असले

तरी ते पुरावे योग्यप्रकारे विचारात घेतलेले दिसून येत नाही.

१८. तक्रारदारास दि.१०/०७/२०१३ रोजीच रात्री १० वाजता पोलीसांनी अटक करुन त्याची अंगझडती घेतली त्यावेळी त्याचेकडे रक्कम रु.१६,३८०/— ही नाक्यावर कमी आढळलेली रक्कम मिळून आली व नाक्यावर कमी आढळली तेव्हढीच रक्कम तक्रारदाराकडे सापडणे हा योगायोग नव्हता असा निष्कर्ष तक्रारदार यास दोषी धरताना चौकशी अधिकारी यांनी काढला मात्र तक्रारदार हा त्या दिवशी नाक्यावर गेलाच नव्हता या स्पष्ट पुराव्याचा योग्य तो विचार तसा निष्कर्ष काढतांना चौकशी अधिकारी यांनी केलेला दिसुन येत नाही. शिवाय कमी आढळलेली रक्कम रु.१६,३८०/— तक्रारदाराने नाक्यांवरुन नेली असे श्री. सरवदे यांनी सांगितले होते असा स्पष्ट आरोप तक्रारदारावर ठेवण्यात आला होता मात्र श्री.सरवदे यांनी चौकशी दरम्यान नोंदविलेल्या त्यांच्या पुराव्यात ती बाब स्पष्टपणे नाकारली असे दिसून येते. श्री.सरवदे यांनी त्यासंदर्भात दिलेला पुरावा नाकारण्यासाठी चौकशी अधिकारी यांनी दिलेली कारणे सयुक्तिक नाहीत असे या न्यायालयाचे मत आहे.

१९. कमी आढळलेली संपूर्ण रकमा जमा करुन तक्रारदारास वाचविण्याचा प्रयत्न इतर कर्मचाऱ्यांनी तक्रारदाराशी संगनमत करुन केला असा निष्कर्ष चौकशी अधिकारी यांनी नोंदविला. त्यासाठी चौकशी अधिकारी यांनी दि.०८/०७/२०१३ ते १८/०७/२०१३ रोजीची चार्जपटटी व इतर दस्तऐवज विचारात घेतले असे चौकशीचे अहवालावरुन दिसून येते मात्र आयुक्त यांनी नाक्यास भेट दिल्यानंतर तक्रारदाराचा इतर कर्मचाऱ्यांशी संपर्क झाला होता हे दाखविणारा कुठलाही पुरावा चौकशी अधिकारी यांचेसमोर उपलब्ध नसूनही दि.१०/०७/२०१३ ते दि. १८/०७/२०१३ या कालावधीत डयुटीवर असणाऱ्या नाका कारकूनांनी संगनमताने भरणा करुन प्रत्यक्ष अपहार घडूनही कागदोपत्री अपराध घडलाच नाही असे दाखविण्याचा प्रयत्न करुन गुन्हा लपविण्याचा प्रयत्न केला असा निष्कर्ष चौकशी अधिकारी यांनी काढलेला दिसतो जो त्यांचेसमोर उपलब्ध असलेल्या पुराव्याशी सुसंगत नाही असे या न्यायालयाचे मत झाले आहे.

२०. सर्वात महत्वाची बाब म्हणजे तक्रारदार हा दि.१०/०७/२०१३ रोजी

नाक्यावर गेलाच नव्हता व त्यादिवशी त्याची साप्ताहिक सुटी होती ही बाब चौकशी अधिकारी यांनी स्विकारूनही तक्रारदाराने रक्कम रु.१६,३८०/— नाक्यावरुन विनापरवानगी नेवून स्वत:च्या फायदयासाठी वापरली असा निष्कर्ष चौकशी अधिकारी यांनी काढलेला दिसून येतो जो त्यांचेसमोर उपलब्ध असलेल्या पुराव्यांशी अनुरूप नाही.

२१. विभागीय चौकशीकामी भारतीय पुरावा कायद्यानुसार ठोस पुरावा सादर करणे गरजेचे नसते तर संभाव्यतेचे प्राबल्य विचारात घेवून निर्णय घ्यावा लागतो ही चौकशी अधिकारी यांनी नमूद केलेली कायद्याची बाजु जरी बरोबर असली तरी ते तत्व वापरूनही तक्रारदाराविरुध्द लावण्यात आलेले दोषारोप सिध्द होण्यापुरता पुरावा चौकशी अधिकारी यांचेसमोर नव्हता असे या न्यायालयाचे मत आहे. चौकशी दरम्यान श्री.जोशी यांनी दिलेला पुरावा चौकशी अधिकारी यांनी योग्यप्रकारे विचारात न घेता त्यांनी आधी दिलेल्या जबाबाचा विचार करून ते तक्रारदारास वाचविण्यासाठी खोटे बोलत असल्याचा निष्कर्ष चौकशी अधिकारी यांनी नोंदवलेला दिसून येतो. तक्रारदारास जर घटनेच्या दिवशीच पोलीसांनी अटक केली होती तर इतर कर्मचाऱ्यांनी कमी आढळून आलेली रक्कम महानगरपालिकेत भरली या बाबीचा तक्रारदाराशी कसा संबंध होता हा महत्वाचा भाग विचारात घेणे चौकशी अधिकारी यांच्यासाठी गरजेचे होते मात्र त्या बाबीस बगल देवून तक्रारदार यांनेच इतर कर्मचाऱ्यांशी संगनमत करुन ती रक्कम जमा केली असा निष्कर्ष चौकशी अधिकारी यांनी नोंदविला व जो चौकशी दरम्यान आलेल्या पुराव्यांशी सुसंगत दिसून येत नाही. तक्रारदारास घ ाबरून साक्षीदारांनी त्याचे बाजुने पुरावे दिले असा निष्कर्ष चौकशी अधिकारी यांनी नोंदवला असला तरी तसा निकर्ष नोंदवण्यासाठी चौकशी अधिकारी यांचेसमोर कुठलाही जोडपुरावा उपलब्ध नव्हता तरीही त्यांनी तसा निष्कर्ष नोंदवला असल्याने तो निष्कर्ष कल्पनाविलासावर आधारित आहे व त्यामुळे स्विकारार्ह नाही.

२२. उपरोक्त नमुद सर्व कारणांसाठी चौकशी अधिकारी यांनी निसर्ग न्यायतत्वानुसार चौकशी केली होती असे जरी दिसून येत असले तरी तक्रारदार याचेविरूध्द लावण्यात आलेले दोषारोप सिध्द झालेत हा त्यांनी नोंदवलेला निष्कर्ष

योग्य व बरोबर नाही असे या न्यायालयाचे मत झाले आहे. तक्रारदारविरुध्दचे दोषारोप या न्यायालयासमोर पुरावे सादर करुन सिध्द करण्याची संधी सामनेवाले यांना देण्यात येत आहे. सबब प्राथमिक मुद्दे क्र.(i) व (ii) वर त्यानुसार माझे निष्कर्ष नमूद करत मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आ दे श</u>**

सामनेवाले यांनी तक्रारदाराची केलेली खातेनिहाय चौकशी कायदेशीर, योग्य व बरोबर आणि निसर्ग न्यायतत्वानुसार घेण्यात आली होती मात्र चौकशी अधिकाऱ्याचे निष्कर्ष योग्य व बरोबर नाहीत.

PRASHANT PRABHAKAR RAJVAIDYA
Digitally signed by PRASHANT PRABHAKAR RAJVAIDYA
Date: 2024.07.29 16:10:09 +0530

दिनांक: २०/०९/२०२४.

*माकम/–*

(प्रशांत प्रभाकर राजवैद्य)
सदस्य, औद्योगिक न्यायालय,
सोलापूर.